आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ मे २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या मतदानाची आकडेवारी जाहीर / देशभरात ६५ पूर्णांक ६८ शतांश टक्के मतदान

- निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार समाप्त

- काँग्रेसला देशाचं संविधान बदलायचं आहे तसंच मागसवर्गियांसाठीचं आरक्षण रद्द करायचं आहे असा भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचा प्रचारसभेत आरोप

- प्रधानमंत्री केवळ मतांसाठी आश्वासनं देत असून त्यांचा जनसामान्यांशी संपर्क तुटला असल्याची काँग्रेस नेत्या प्रियंका गाधी यांची प्रचारसभेत टीका

- देशाच्या औद्योगिक उत्पादनात गेल्या मार्च महिन्यात चार पूर्णांक नऊ दशांश टक्के वाढ

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातला सामना कोलकात्यात सुरु

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या मतदानाची आकडेवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. या टप्प्यात देशभरात ६५ पूर्णांक ६८ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात ६६ पूर्णांक एकोणनव्वद टक्के

पुरुष तर ६४ पूर्णांक ४१ शतांश टक्के महिला मतदार होत्या. २५ पूर्णांक २ दशांश टक्के तृतीयपंथीय मतदारांनी मतदान केलं. महिला मतदारांचं सर्वात जास्त प्रमाण आसामात होतं तर सर्वात कमी प्रमाण उत्तरप्रदेशात होतं असं निवडणूक आयोगाच्या आकडेवारीत म्हटलं आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज थांबला. आजच्या अखेरच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. देशातल्या ९ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशात मिळून ९६ मतदार संघात येत्या सोमवारी १३ मे रोजी मतदान होणार आहे. महाराष्ट्रातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या ११ मतदारसंघांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><><>**

काँग्रेसला देशाचं संविधान बदलायचं असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना दिलेलं आरक्षण संपवायचं आहे असं प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ओडिशामध्ये बारगढ इथं आज दुपारी ते प्रचारसभेत ते बोलत होते. काँग्रेसला देशाचं संविधान बदलू देणार नाही आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना दिलेलं आरक्षण संपवू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. ओदिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांच्यावरही त्यांनी टीका केली. ओडिशामध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी होत आहेत.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश बदलत आहे. देशाची अर्थव्यवस्था भक्कम करून देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज आहे म्हणून भाजपच्या मागे खंबीरपणे उभे राहा असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. महायुतीचे पुण्यातले उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी काँग्रेसकडे विकासाचा कोणताही मुद्दा नाही. त्यामुळे भाजपला संविधान बदलायचे आहे असा अपप्रचार त्यांनी चालू केला आहे, जातीचं राजकारण करायला सुरुवात केली आहे, अशी टीका गडकरी यांनी केली.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केवळ मतांसाठी आश्वासन देत असल्याचा आरोप काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत केला. देशभरात विविध ठिकाणी आदिवासींवर झालेल्या अत्याचारांना विद्यमान सरकार जबाबदार आहे. देशभरातल्या २२ लाख आणि राज्यातल्या २ लाख आदिवासींना या सरकारनं पट्टे दिले नाही, असंही त्या म्हणाल्या. या देशात शेतकरी, कष्टकरी नव्हे तर मोठ्या उद्योगपतींची कर्ज माफ होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज पुण्यातल्या जाहीर सभेत बोलताना लोकशाही टिकवायची असेल तर नेहरू आणि गांधींचे विचार भक्कम करायला पाहिजे असं सांगितलं. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ हडपसर इथं आयोजित जाहीर सभेमध्ये ते बोलत होते. पूर्वी निवडणुका दोन ते तीन टप्प्यांमध्ये

होत होत्या मात्र आता सहा ते सात टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत. ही बाब निवडणूक आयोगावर संशय निर्माण करणारी असल्याचंही पवार म्हणाले.

<><><><><><>

एक देश एक नेता या संकल्पनेचा भाजपा पुरस्कार करत असल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते अरविंद केजरीवाल यांनी केला आहे. नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारतीय जनता पक्ष, आम आदमी पक्षाला नष्ट करू इच्छित आहे. परंतु, आप हा केवळ पक्ष नसून विचारधारा असल्याचं ते म्हणाले. इंडिया आघाडी केंद्रामध्ये सरकार स्थापन करणार असून आप हा त्या सरकारचा भाग असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपने विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात पाठवल्याचा आरोपही त्यांनी केला.

<><><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण ‘मुंबई उत्तर’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><><>

देशाच्या औद्योगिक उत्पादनात गेल्या मार्चमधे चार पूर्णांक नऊ दशांश टक्के वाढ झाली आहे. ही वाढ मागच्या वर्षाच्या याच महिन्यापेक्षा जास्त असली तरी या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यातल्या वाढीपेक्षा कमी आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात औद्योगिक उत्पादनातली वाढ पाच पूर्णांक आठ दशांश नोंदवली गेली आहे. काल जाहीर झालेल्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकात ही माहिती जाहीर केली गेली आहे. या आकडेवारीनुसार मार्च महिन्यात खाण उद्योगात एक पूर्णांक दोन

टक्क्यांनी तर पूर्ण आर्थिक वर्षात साडे सात टक्क्यांनी घट झाली. तर वीजनिर्मितीत मार्च महिन्यात आठ पूर्णांक सहा दशांश आणि पूर्ण आर्थिक वर्षात सात पूर्णांक एक दशांश टक्के वाढ झाली.

**<><><><><><>**

परकीय गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सतरा हजार कोटींची गुंतवणूक भारतीय बाजारातून काढून घेतली आहे. परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात एक लाख आठ हजार कोटींचे समभाग खरेदी केले होते, तर १० मे पर्यंत एक लाख २६ हजार कोटींच्या समभागाची विक्री केली. असं नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेडच्या आकडेवारीत सांगण्यात आलं आहे. परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात काढून घेतल्यामुळे शेअर बाजारात घसरण झाली आहे.

**<><><><><><>**

निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यानंतर सरासरी मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यासाठी निवडणूक आयोगाने अवलंबलेल्या पद्धतीवर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आक्षेप घेतला आहे. प्रत्यक्ष मिळालेल्या मतांची पूर्ण आकडेवारी प्रसिद्ध करावी असं, त्यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. निवडणूक प्रक्रियेला बाधा ठरणाऱ्या सत्ताधारी नेत्यांच्या, सांप्रदायिक आणि जातीयवादी वक्तव्याविरोधात आयोगानं कारवाई करण्याची तत्परता का दाखवली नाही, असा प्रश्नही खर्गे यांनी पत्रातून विचारला आहे.

**<><><><><><>**

गुजरातमध्ये दाहोद लोकसभा मतदारसंघात पार्थमपूर मतदान केंद्रावर आज पुन्हा मतदान झाले. याठिकाणी ७ मे रोजी झालेल्या मतदानात अनियमितता आढळल्यानंतर निवडणूक आयोगाने नव्याने मतदान घेण्याचे आदेश दिले होते.

इथल्या ४ मतदान कर्मचाऱ्यांसह ६ जणांना निलंबित करण्यात आले आहे. दुपारी १ वाजेपर्यंत ४१ पूर्णांक २६ शतांश टक्के मतदान झाले आहे. मतदानामध्ये ३६ पूर्णांक ५७ शतांश टक्के पुरुष आणि ४६ पूर्णांक ०४ शतांश टक्के महिला मतदारांचा समावेश आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओची तक्रार आल्यानंतर दाखल केलेल्या अनियमिततेच्या अहवालाच्या आधारे निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी आणि व्यापार आणि तंत्रज्ञान परिषदेच्या सहयोगाबाबत आशावादी असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्लीत यूरोपीय महासंघ राष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. भारत-मध्य पूर्व-यूरोप दरम्यान गेल्यावर्षी स्थापन केलेला आर्थिक पट्टा आणखी विकसित करणं भारतासाठी महत्वपूर्ण असून हा विकास पुढच्या टप्प्यात नेण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं. युरोपीय महासंघ हा आपला सर्वात मोठा आर्थिक भागीदार असल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय तपास यंत्रणेनं, आज जम्मू भागातल्या पाकिस्तान पुरस्कृत सहा दहशतवादी  ठिकाणांचा तपास केला. हिंसक हल्ले करण्याच्या कटाशी संबंधित प्रकरणात, एनआयएच्या पथकानं जम्मू भागातल्या दोडा, रामबन आणि किश्तवाड जिल्ह्यांमध्ये कसून शोध घेतला. या तपासात डिजिटल उपकरणं आणि  प्रतिबंधित दहशतवादी संघटनांशी संबंधित दस्तवेजांसह गुन्हेगारी सामग्री जप्त करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. कोलकत्यातल्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर पावसामुळे होत असलेल्या सामन्याला विलंब होत आहे.

//<><><><><><>//